# वार्षिक अहवाल -पाली विभाग

**[ Annual Report]**

**1.** ब्रिज कोर्स – महाविद्यालयात दिनांक **13** जुलै **2023** ते **15** जुलै **2023** दरम्यान बी.ए. प्रथम वर्षाला प्रवेश घेणाऱ्या पाली आवश्यक व पाली साहित्य या विषयाच्या विद्यार्थिनींकरिता ब्रिज कोर्स घेण्यात आला. यामध्ये विद्यार्थिनींना विषयाची ओळख करून देण्यात आली व अभ्यासक्रमाची थोडक्यात माहिती देण्यात आली.

**2. अतिथी व्याख्यान- 'पाली साहित्यातील विनयाचे महत्त्व'**

महाविद्यालयात दिनांक 23 फेब्रुवारी 2024 रोजी पाली साहित्यातील विनयाचे महत्त्व या विषयावर सकाळी 11.30 वाजता अतिथी व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानाकरिता आंतरराष्ट्रीय बौद्ध अध्ययन केंद्र व पाली विभाग येथे कार्यरत असलेल्या प्राध्यापक ममता रामटेके मॅडम यांना निमंत्रित केले होते. त्यांनी हे निमंत्रण स्वीकारून विद्यार्थिनींना विनयपिटक या ग्रंथाबद्दल माहिती देऊन भिक्षु व भिक्षुनींचे नियम सांगितले. आपल्या दैनंदिन जीवनात विनयाचे महत्त्व व नैतिक मूल्यांविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शरद सांबारे सरांनी विद्यार्थिनींना मेहनत आणि सातत्याने अभ्यास करून जीवनात यशस्वी होण्याकरिता मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी उस्फूर्तपणे कार्यक्रमात सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन पाली विभागातील प्राध्यापिका डॉ. रश्मी नारनवरे यांनी केले.

**3. कथाकथन स्पर्धा**

पाली विभाग आणि आंतरराष्ट्रीय बौद्ध अध्ययन केंद्र रामदास पेठ नागपूर यांच्यावतीने दिनांक 12 मार्च 2024 रोजी जाईबाई चौधरी विद्यालय सदर नागपूर येथे सकाळी 11 ते दुपारी चार या वेळेत पाली साहित्याशी संबंधित कथाकथन स्पर्धेचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे उद्घाटक आचार्य सुधाकर चौधरी तसेच डॉ.नीरज बोधी यांच्या अध्यक्षतेत कार्यक्रम संपन्न झाला. आपल्या महाविद्यालयातील बीए भाग। च्या विद्यार्थिनी कु. प्रियंका मून, कु. प्रिया सु. शाहू कु. ममता न. साहू व कु. पूजा सं. दांदरे यांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या कार्यक्रमामुळे पाली भाषेच्या प्रचार व प्रसारात सहकार्य झाले तसेच विद्यार्थिनींची पाली साहित्यप्रती रुची निर्माण झाली व त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळाल

**4. पाली दिवस**

महाविद्यालयात दिनांक 1 एप्रिल 2024 रोजी पाली दिवस साजरा करण्यात आला. या दिवशी पाली विषयाच्या सर्व विद्यार्थिनींना पाली भाषेचे महत्त्व, पाली भाषेचा उगम, पाली भाषेचा प्रचार व प्रसार तसेच पाली भाषेशी संबंधित उपलब्ध रोजगाराच्या संधी याबाबत माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये पाली भाषेच्या अध्ययना विषयी रुची व जागरूकता निर्माण झाली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन पाली भागातील प्राध्यापिका डॉ. रश्मी नारनवरे यांनी केले.

दिनांक- 2-04-2024

डॉ. रश्मी नारनवरे

पाली विभाग

प्राचार्य

डॉ. शरद सांबारे

Officiating Principal
Yashoda Girls' Arts & Commerce College
Sneh Nagar, Nagpur.